# <u>संधी</u>

डोळे फाडून वाट तुझी पहावी
जवळ येऊन हातून निसटून जावी
गेल्यावर आम्हा कळे ती होती संधी
उरला मूर्खपणा हाती, दुसरे न काही...

होता मोकळा वेळ तो आळसात गेला
दिसली जेव्हा संधी तेव्हा घाई झाली
महत्वपूर्ण कामाचेही विस्मरण झाले
उरला मूर्खपणा हाती, दुसरे न काही...

तयारीचा वेळ अविचारातच गेला
कामाचा वेळ ठरवाठरवीतच गेला
कार्य अर्धवटच राहिले नि वेळ संपली
उरला मूर्खपणा हाती, दुसरे न काही...

